**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक :- २३२** **दिनांक :- २७/०८/२०२१**

## ३,८२,५००/- रूपये किंमतीचा २५.५०० कि.ग्रॅम वजनाचा गांजा हस्तगत करुन २ आरोपी अटकेत.

दिनांक २३/०८/२०२१ रोजी सायंकाळी विरार पुर्वेच्या कारगील नगरमधील गणेश चौकात दोन इसम गांजा नावाचा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची खात्रिशीर बातमी मिळाल्याने विरार पोलीसांनी सदरबाबत वरिष्ठांना माहिती देवून सापळा रचून दोन संशईतांना ताब्यात घेतले असता त्यांचेकडे असलेल्या दोन बॅगांमध्ये एकुण २५.५०० किंलो ग्रॅम वजनाचा ३,८२,५००/- रूपये किंमतीचा गांजा नावाचा अंमली पदार्थ मिळून आल्याने सदरचा गांजा जप्त करण्यात आला असून आरोपी नामे १) अन्वर इस्माईल शहा वय २६, रा. महाकाली अपार्टमेंट, गणेश चौक, कारगील नगर मनवेलपाडा, विरार पुर्व व २) सोनी उर्फ भरत चंदु सोलंकी वय ४० रा महाकाली अपार्टमेंट, गणेश चौक, कारगील नगर मनवेलपाडा, विरार पुर्व यांना अटक करण्यात आली आहे. सदरबाबत विरार पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७२४/२०२१ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८ (क), २२ (ब), ा (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-३, श्रीमती रेणुका बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुरेश वराडे, गुन्हे प्रकटिकरण शाखेतील पोउपनी. अभिजीत टेलर, संदेश राणे, पोहवा. सचिन लोखंडे, पो.ना. विजय दुबळा, हर्षद चव्हाण, भुषण वाघमारे, संदिप शेरमाळे, पोशि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, पवन पवार, सागर घुगरकर यांनी केली आहे.

-----ooo-----